# प्रकरण 3 रे: महाराष्ट्रातील पर्यटन विकासाचे नियोजन

## ३.१ महाराष्ट्रातील पर्यटनाचा विकास
## ३.२ महाराष्ट्रातील पर्यटनाचे नियोजन

## ३.१ महाराष्ट्रातील पर्यटनाचा विकास (Development of tourism in Maharashtra)

महाराष्ट्र हे पर्यटनाच्या दृष्टीने वैभवशाली वारसा असलेले राज्य आहे. प्रदीर्घ ऐतिहासिक परंपरा, समृद्ध सांस्कृतिक वारसा, निसर्गाचा वरदहस्त लाभलेले प्राकृतिक सौंदर्याची स्थळे, यामुळे हे राज्य जागतिक पर्यटन नकाशावर विराजमान झालेले आहे. अजिंठा वेरूळ, एलिफंटा सारखी जागतिक कीर्तीची लेणी व शिल्पे पुणे, औरंगाबाद, सातारा, कोल्हापूर यासारखे ऐतिहासिक नगरे येथे आहेत. धार्मिक स्थळांचे या राज्यात जनामनाची पकड घेतली आहे. महाराष्ट्राची अध्यात्मक राजधानी असलेले पंढरपूर, शिर्डी, शेगाव, तुळजापूर, कोल्हापूर, नाशिक, त्रंबकेश्वर, पैठण, देहू, आळंदी, जेजुरी असे अनेक देवस्थाने आहेत. महाबळेश्वर, खंडाळा, लोणावळा, माथेरान, चिखलदरा ही थंड हवेची ठिकाणे आणि कोयनानगर, जायकवाडी, भाटघर चांगली धरणे पर्यटन स्थळे म्हणून दिवसंदिवस महत्त्वाची ठरत आहेत. सहासाची आवड असणाऱ्या पर्यटकासाठी दाजीपूर, चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा यासारखी अभयारण्ये उपलब्ध आहेत. महाराष्ट्राची राजधानी असणारे मुंबई नगरी ही संपूर्ण भारताची औद्योगिक राजधानी आहे. तसे ते एक मुख्य पर्यटन केंद्रही आहे. अशाप्रकारे महाराष्ट्राचा पर्यटन क्षेत्रात विकास होत आहे परंतु अद्यापही अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारे या व्यवसायाकडे पुरेसे लक्ष दिले गेले नाही महाराष्ट्रात पर्यटन विकासाला भरपूर वाव आहे.

### १.पर्यटन संचनालय

कोणत्याही गोष्टीचा विकास त्यासंबंधी स्वतंत्र खाते असल्याशिवाय होऊ शकत नाही. या दृष्टिकोनातून महाराष्ट्रात इ.स. **1969 मध्ये पर्यटन संचनालयची स्थापना करण्यात आली**. राज्यात पर्यटनाचा विकास करण्यासाठी राज्य सरकारने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल आहे.

### २.महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (Maharashtra tourism Development Corporation, MTDC)

इ.स. 1969 मध्ये महाराष्ट्रात पर्यटन संचालनालयाची स्थापना करण्यात आली तर राज्यातील पर्यटन विकासाची जबाबदारी इ.स. 1975 मध्ये स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य पर्यटन

विकास महामंडळाकडे सोपवण्यात आली. मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर, अमरावती, औरंगाबाद या राज्य प्रशासन विभागाच्या ठिकाणी व नवी दिल्ली येथे विभागीय कार्यालय स्थापन करण्यात आली आहेत. पर्यटन क्षेत्राचा शोध, विकास, मार्गदर्शक इत्यादी कार्य या कार्यालयामार्फत केले जातात. या मंडळातर्फे राज्यात 47 ठिकाणी पर्यटक निवासाची सोय करण्यात आली आहे. एकूण 4150 पर्यटकांची राहण्याची व्यवस्था केली आहे. पुणे, पाचगणी, शिर्डी, पंढरपूर इत्यादी पर्यटनस्थळाच्या सहलीसाठी महामंडळाने काही बस गाड्या खरेदी केल्या आहेत. महाबळेश्वर, पुणे, मुंबई, लोणावळा, औरंगाबाद इत्यादी ठिकाणी पर्यटन स्थळ दर्शनासाठी दररोज सहली आयोजित केल्या जातात. आठव्या योजने काळात या सर्व उपक्रमावर 65 कोटी रुपये खर्च केला गेला.

महामंडळाकडे विस्ताराच्या व विकासाच्या अनेक योजना आहेत यामध्ये महाबळेश्वर, गणपतीपुळे या लोकप्रिय पर्यटन स्थळाच्या ठिकाणी असलेल्या पर्यटक निवासाचा विचार करण्यात येत आहे. महाराष्ट्रातील किल्ल्याचा पर्यटन स्थळ म्हणून उपयोग करण्यासाठी प्राथमिक तयारी सुरू आहे. काही महत्त्वाच्या मार्गावर मोटेल्स सुरू करण्याचा प्रस्ताव महामंडळाकडे आहे. गेल्या पंचवार्षिक योजनेमध्ये तुळजापूर पर्यटन स्थळाचा विकास करण्यात आला. सध्या सागरी किनारा चे आकर्षण वाढले आहे त्याला योग्य प्रतिसाद देण्यासाठी सागरी किनाऱ्यावरील जिल्ह्यात हॉटेल्स, पर्यटन निवास बांधण्याची योजना आखण्यात येत आहे. पर्यटनाचा विकास करण्यासाठी निरनिराळ्या क्रीडा प्रकाराचा विकास करण्यात यात येत आहे. भारतात येणारे एकूण पर्यटकांपैकी निम्मी पर्यटक महाराष्ट्राला भेट देतात. राज्यातील वन्य पशुपक्षी हा मौलिक ठेवा आहे त्या विषयी जनमाणसात उत्सुकता वाढावी यासाठी वन खात्यामार्फत काही पर्यटक योजना आखण्यात येत आहेत. राज्यातील संपूर्ण ऐतिहासिक वारसा पर्यटकांनी जपावा म्हणून छत्रपती शिवरायांचे जन्मस्थान असलेला शिवनेरी किल्ल्याचा विकास करण्यात येत आहे. महाराष्ट्र मध्ये महामंडळातर्फे 47 पर्यटन ठिकाणी निवास व्यवस्था सुरू करण्यात आली आहे. त्यामध्ये अजिंठा, औरंगाबाद, भंडारदरा, चिखलदरा, ओढा नागनाथ, गणपतीपुळे, माथेरान, महाबळेश्वर, पन्हाळा, पाचगणी, तोरणमाळ, त्रंबकेश्वर, रायगड व शिर्डी इत्यादी पर्यटन स्थळाचा समावेश होतो.

### ३.भोजन व्यवस्था

महामंडळाने अनेक ठिकाणी पर्यटकांसाठी भोजनालया ची व्यवस्था केली आहे. हे महामंडळ पुणे, शिर्डी व पाचगणी येथे स्वतःची हॉटेल्स चालवते या हॉटेल्समधून पर्यटकांना भोजन पुरवले जाते.

## ४.पर्यटकांसाठी निवास व्यवस्था

महाराष्ट्रात पर्यटन विकास महामंडळ स्थापन झाल्यावर या महामंडळाने पर्यटकांसाठी ठिकठिकाणी निवास बांधले आहेत. हे मंडळ राज्यात 47 ठिकाणी पर्यटन निवासालये चालवते त्यात ४ हजारहून अधिक पर्यटकांची निवासाची सोय झाली आहे.

## ५.वाहनांची व्यवस्था व सहलीचे आयोजन

पर्यटन विकास महामंडळाकडे मंडळाच्या मालकीची 28 आराम बसेस व २ मिनी बसेस आहेत. राज्यातील प्रेक्षणीय स्थळे पाहण्यासाठी महामंडळ सहलीचे आयोजन करते. स्थानिक सहली महामंडळामार्फत आयोजित केल्या जातात तसेच सागर दर्शन, तीर्थक्षेत्रे, सांस्कृतिक, धार्मिक आणि वनपर्यटनही आयोजित केले जातात.

## ६.मोटेल्स

पुणे- मुंबई, नाशिक-पुणे, औरंगाबाद- पुणे, कोल्हापूर -पुणे या महामार्गावर पर्यटकांसाठी मोटेल्स बांधण्यात येत आहेत. अशी ३० मोटेल्स बांधण्याची योजना आहे. त्यामुळे महामार्गाने जाणाऱ्या पर्यटकांची उत्तम सोय होईल आणि त्यामुळे पर्यटनाच्या विकासाला आणखी चालना मिळेल.

## ७.मागास भागात पर्यटनाचा विकास

पर्यटनला उद्योगाचा दर्जा देण्याचे महाराष्ट्र शासनाने मान्य केली आहे. यानुसार मागास भागात सवलती व सवलतीने वित्तपुरवठा करून पर्यटनाचा विकास करण्याची योजना आहे. याशिवाय अनिवासी भारतीयांना पर्यटन उद्योगात गुंतवणूक करण्यास परवानगी तसेच खाजगी उद्योगांची पर्यटन केंद्राचा विकास करण्यासाठी मदत देण्याचे शासनाने ठरवले आहे.

## ८.कोकणातील पर्यटन विकास

कोकण हा भाग पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो. म्हणून कोकणात पर्यटन विकास करण्यात येत आहे. यासाठी समुद्रकिनाऱ्यावर ठिक ठिकाणी 32 हॉटेल्स व पर्यटक निवास बांधण्याची शासनाची योजना आहे.

## ९.मुंबई येथील पर्यटन विकासाची योजना

मुंबई हे महाराष्ट्रातील एक औद्योगिक, व्यापारी, सांस्कृतिक व शैक्षणिक केंद्र आहे. तेथे परदेशातून येणाऱ्या पर्यटकांची संख्या जास्त असते म्हणून नव्या मुंबईजवळ अनिवासी भारतीय पर्यटकांना एका नगरीची उभारणी करण्याची योजना विचाराधीन आहे.

## १०.पंचवार्षिक योजनेतील पर्यटन विकास

महाराष्ट्र राज्याची निर्मिती 1960 मध्ये झाली तोपर्यंत भारताच्या दोन पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या होत्या. तिसऱ्या व चौथ्या योजनेत राज्यातील योजनात पर्यटन विकासाकडे फारसे लक्ष देण्यात आले नव्हते. पाचव्या व सहाव्या योजनेत राज्याच्या निर निराळा भागातील पर्यटनस्थळाचा विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याचे ठरले. त्यासाठी बरीच तरतूद करण्यात आली होती. त्यामुळे राज्यात पर्यटनाचा विकास होऊ लागला. सातव्या योजनेत महाराष्ट्रात माहुरगड,तुळजापूर व अक्कलकोट येथे नवीन पर्यटन निवास बांधण्यात आले. रायगड जिल्ह्यातील काशीद, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला येथे पर्यटक निवास बांधण्याचा प्रस्ताव होता. त्याचप्रमाणे पर्यटक निवास बांधण्यात येत आहेत. या काळात भंडारदारा, पन्हाळा, महाबळेश्वर, गणपतीपुळे इत्यादी पर्यटन केंद्राचा विस्तार करणे. शिवनेरी किल्ला परिसराचा विकास करणे व राज्याच्या 41 किल्ल्याची दुरुस्ती योजना आहे या योजनेत महाराष्ट्र, सांस्कृतिक, धार्मिक, वन व  मनोरंजन अशा विविध पर्यटनाच्या विकासावर भर देण्यात आला. त्यासाठी 65 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती.

# ३.२ महाराष्ट्रातील पर्यटनाचे नियोजन (Planning of tourism in Maharashtra)

महाराष्ट्राचा पर्यटन विकास झालेला असला तरी काही अपवाद वगळता पर्यटन व्यवसायाचा राज्याला अद्याप फायदा व्हावा तसा झाला नाही. राज्यात येणाऱ्या परदेशी पर्यटकांचे प्रमाण कमी झाले आहे. मुंबई येथे विमान वाहतुकीची सोय आहे म्हणून पर्यटक राज्यात येतात. अजिंठा वेरूळ लेणी ही परदेशी पर्यटकांचे खास आकर्षण आहेत. तर ठिकाणी त्याचा प्रतिसाद अभावानेच आढळतो. गेल्या काही वर्षापासून पुणे येथील गणेशोत्सवात काही प्रमाणात परदेशी पर्यटक हजेरी लावतात परंतु तेही त्यांचा प्रतिसाद जमतेम असतो. देशांतर्गत पर्यटन काही प्रमाणात राज्यात विकसित होत असले तरी त्याचा फारसा प्रतिसाद मिळत नाही. फक्त स्थानिक पर्यटन मात्र राज्यात झपाट्याने विकसित होत आहे. थंड हवेचे ठिकाण

उदाहरणार्थ माथेरान, खंडाळा, लोणावळा, महाबळेश्वर, चिखलदरा येथे स्थानिक पर्यटकांची चांगली गर्दी असते. महाराष्ट्र मध्ये सर्वाधिक धार्मिक पर्यटन चालते परंतु त्यामुळे पर्यटन व्यवसायाला फारसा फायदा मिळत नाही कारण त्यापासून फारसे उत्पन्न मिळत नाही उलट अशा भाविकांची सोय करण्यासाठी भांडवल खर्च करावा लागतो राज्यात येत्या काही वर्षात पर्यटनाचा विकास करण्यासाठी योजना पर्यटन महामंडळाकडून आखाव्या लागतील. त्यातली एक म्हणजे परदेशी पर्यटकांना राज्यातील पर्यटनस्थळांकडे आकर्षित करण्यासाठी मुख्यता चांगली निवासव्यवस्था, हॉटेल्स बाधावी लागतील. हॉटेल विस्तार करावा लागेल भारताबाहेर लंडन, अमेरिकेत महाराष्ट्र पर्यटन विभागाने विभागीय कार्यालय उघडले पाहिजेत. दुसरे म्हणजे येथील अलिबाग, श्रीवर्धन, सावंतवाडी, राजापूर, वेंगुर्ला या ठिकाणच्या बीचेस पर्यटन स्थळ म्हणून विकास करावा लागेल. परदेशी पर्यटक याच ठिकाणी येण्याची शक्यता अधिक आहे.

स्थानिक पर्यटकांना उत्तेजन देण्यासाठी सध्याच्या पर्यटन क्षेत्राचा विकास करावा लागेल परंतु नवनवीन पर्यटन स्थळे शोधावी लागतील तेथे निवास व वाहतूक सुविधा कराव्या लागतील. हॉटेल्स यांची सोय करावी त्या दृष्टीने अद्याप महामंडळाने द्यावे तितके लक्ष दिलेले नाही. शाळा-कॉलेजेस येथील विद्यार्थ्यांची याबाबत मदत घेतल्यास प्रतिसाद चांगला मिळेल. तेथे वृक्ष लागवड करता येईल. त्याच्यामध्ये पर्यटनाची आवड निर्माण होऊ शकेल अशा विकासाच्या योजना आखताना राजस्थानातील **पॅलेस ऑन व्हील** सारख्या योजना कोकण किनारी प्रदेश किंवा अजंटा वेरुळ, औरंगाबाद येथे आखल्या पाहिजेत. गोव्या प्रमाणेच महाराष्ट्राच्या किनाऱ्यावर बीजेचा विकास करावा लागेल. या सर्व ठिकाणी आर्थिकदृष्ट्या परवडतील अशी निवास व भोजन सुविधा असाव्यात. राज्यातील लोकांची आर्थिक परिस्थिती विशेषता सहावा वेतन आयोग लागू केल्यानंतर लोकांच्या खिशात पैसा मिळू लागला आहे त्यामुळे साहजिकच लोकांची सहज वृत्ती पर्यटनाकडे वाढू लागले आहे. पर्यटनात ज्यांना रस वाटत आहे त्यांना पर्यटन महामंडळाने प्रोत्साहन दिले पाहिजे असे झाल्यास राज्यात पर्यटन व्यवसायाचा चांगला विकास होऊ शकेल असे मानले जाते. या सर्वांचा विचार करता महाराष्ट्रातील पर्यटन उद्योगाचे भवितव्य अतिशय उज्ज्वल आहे असे सांगितले जाते.

राज्यातील पर्यटन केंद्रांची सध्याची परिस्थिती फारशी चांगली नाही. अपुऱ्या सुविधा, पर्यटकांना होणारा त्रास आणि ढिसाळ नियोजन यामुळे अनेकदा पर्यटक महाराष्ट्रातील पर्यटनाकडे पाठ फिरवतात. पर्यटनाला आलेली ही मरगळ काढून टाकण्यासाठी राज्यसरकारने राज्यातील पर्यटन केंद्रे फायनान्शियल मॉडेल म्हणून विकसित करण्याचा निर्णय घेतला असून, त्यासाठी जागतिक दर्जाच्या

'केपीएमजी' या कंपनीची निवड करण्यात आली आहे. ही कंपनी राज्यातील पर्यटनाला डिजीटल माध्यमातूनही विकसित करणार असून, लवकरच पहिल्यांदाच महाराष्ट्र राज्य सरकारची पर्यटनासंदर्भातील वेबसाइटही तयार करण्यात येणार आहे.

राज्य सरकारने २०१६ मध्ये राज्याचे पर्यटन धोरण तयार केले आहे. त्या धोरणामध्ये पर्यटनासंदर्भातील अनेक मुद्द्यांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. सरकारचे पुढील दहा वर्षांचे पर्यटनाच्या दृष्टीने असलेली ध्येयधोरणेही या मध्ये देण्यात आली आहेत. ती योग्यपद्धतीने राबवण्याची जबाबदारी 'केपीएमजी' वर सोपवण्यात आली आहे. इतर राज्यांप्रमाणेच महाराष्ट्रातील पर्यटनाला जागतिक दर्जा मिळावा, यासाठी ही कंपनी प्रयत्नशील राहणार आहे. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या अशा पर्यटन केंद्रांना एक उत्तम फायनान्शियल मॉडेल म्हणून विकसित करणे, हे प्रमुख ध्येय असणार आहे. निसर्ग पर्यटन, बॉलिवूड पर्यटन, वारसा पर्यटन, ऐतिहासिक पर्यटन, वन्यजीवन पर्यटन अशा विविध पर्यटन क्षेत्रांमध्ये काम करून अधिकाधिक पर्यटक आकर्षित व्हावेत, यासाठी 'केपीएमजी'तर्फे वेगवेगळया प्रकारच्या योजना सरकारच्या पर्यटन विभागाला सुचवल्या जाणार आहेत. याशिवाय महाराष्ट्र टुरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनकडे (एमटीडीसी) असलेल्या वास्तू, हॉटेल्स, रिसॉर्ट, जागांवर पर्यटकांना उच्च दर्जाच्या सुविधा मिळाव्यात असाही या कंपनीचा प्रयत्न असणार आहेत. महाराष्ट्रात ठिकठिकाणी पर्यटन विभागातर्फे अनेक महोत्सव आयोजित केले जातात. हे महोत्सव बऱ्याचदा फसतात. त्यामध्ये पर्यटकांना आकर्षित करून घेणारे काही उपक्रम आयोजित झाले तर त्या ठिकाणी पर्यटकांची संख्या वाढेल. त्याकरिता काही नावीन्यपूर्ण उपक्रम आखणे, योजना तयार करण्याची जबाबदारी 'केपीएमजी'वर सोपवण्यात आली आहे.

बदलत्या काळानुसार पर्यटनाला डिजिटली चालना देणेही अत्यंत गरजेचे आहे. वेगवेगळया माध्यमांच्या वापरातून महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे आणि तेथील विविध उपक्रम नागरिकांपर्यंत कसे पोहोचतील, याबाबतही राज्य सरकारला वेळोवेळी सल्लामार्गदर्शन करण्याची जबाबदारी 'केपीएमजी'वर सोपवण्यात आली असून पुढील काही वर्षांमध्ये महाराष्ट्राचे पर्यटनाला जागतिक स्तराचा दर्जा मिळवून देण्याची कामगिरी करण्याचा मानस असल्याचे, पर्यटन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

१. पर्यटन केंद्रांना फायनान्शियल मॉडेल म्हणून विकसित करणे.

२. 'एमटीडीसी'च्या स्थावर मालमत्तांची सुधारणा करून पर्यटकांना उत्तम सुविधा पुरवणे.

३. निसर्ग पर्यटन, बॉलिवूड पर्यटन, वारसा पर्यटन, ऐतिहासिक पर्यटन, वन्यजीवन पर्यटनाला चालना देणे.

४. पर्यटन विभागातर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या महोत्सवांमध्ये नावीन्यता आणणे.

५. नवे टुरिझम प्रकल्प उभारण्यासाठी प्रयत्न करणे.

६. पर्यटन विभागाला घरोघरी पोहोचवण्यासाठी डिजिटल माध्यमातून सक्षम करणे.

## संदर्भ ग्रंथ सूची


१. डॉ.शिंदे एस. बी.(२००६): पर्यटन भूगोल, फडके प्रकाशन, कोल्हापूर

२. डॉ. शिंदे सुनिता शंकरराव (२०१३): पर्यटन भूगोल, एज्युकेशनल पब्लिशर्स, औरंगाबाद

३. डॉ. घारपुरे विठ्ठल (२००१): पर्यटन भूगोल, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर

४. खतीब के. ए (२००६): पर्यटन भूगोल, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

५. दूरशिक्षण केंद्र (२००९): पर्यटन भूगोल, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

६. प्रा. अ.वि. भागवत (१९९८): पर्यटन भूगोल, अश्वमेध प्रकाशन, पुणे

७. .https://maharashtratimes.indiatimes.com/

८. https://hi.wikipedia.org/wiki/